**आर. सी. सी. क्र.८५८/२०१०**
**महाराष्ट्र सरकार वि. नामदेव शेलार**
**निशाणी क्रमांक ०८**

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र. १**
साक्षीदाराचे नाव- गणपत वाराजी केदारी,
वय. ५४ वर्ष, धंदा.- निवृत्त,
रा. आळंदी, ता. राजगुरुनगर, पुणे.

**सरतपास शपथेवर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे सरकारी पक्षातर्फे श्रीमती एस.बी. बोरकर वकील यांच्यातर्फे सुरु**

दि.०५.०७.२०१० रोजी मी शिवाजीनगर डेपोत एसटी ड्रायव्हर म्हणून काम करत होतो. त्या दिवशी पुणे ते शिर्डी जात असताना भोसरी एमआयडीसी जवळ नाशिक फाटा येथे वखारी जवळ दोन अज्ञात इसमांनी बसवर दगड मारले होते. त्याबाबत मी तक्रार दाखल केलो होतो. मी आरोपींना ओळखत नाही. अज्ञात इसमांविरुद्ध फिर्याद दाखल करण्यात आली होती. पोलिसांनी तपासानंतर आरोपींची नावे सांगितली होती ती मला आता आठवत नाहीत. मी त्यांना आजरोजी ओळखत नाही. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.०९** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed
by ANNAPURNA
ISHWARA AWATI
Date: 2025.08.01
11:52:12 +0530

( श्रीमती अ.ई. आवटी )
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**पिंपरी, पुणे.**

**दिनांक- ३०.०७.२०२५**

**आर. सी. सी. क्र.८५८/२०१०**
**महाराष्ट्र सरकार वि. नामदेव शेलार**
**निशाणी क्रमांक १०**

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र. २**
साक्षीदाराचे नाव- रमेश ढाकू राठोड,
वय. ४३ वर्ष, नेमणूक.- पोलिस हवालदार भोसरी पोलिस स्टेशन,

**सरतपास शपथेवर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे सरकारी पक्षातर्फे श्रीमती एस.बी. बोरकर वकील यांच्यातर्फे सुरु**

सदर प्रकरणातील फिर्यादी गणपत वाराजी केदारी यांना साक्षी समन्स काढण्यात आले होते. सदर साक्षीदारास समन्सची बजावणी करण्यात आलेली आहे. साक्षीदार पोलिस हवालदार टी.एन. राठोड या साक्षीदारास साक्षीसमन्स काढले असता सदर साक्षीदार मयत असल्याबाबतचे निदर्शनास आले तसा दाखला सदर प्रकरणात दाखल करण्यात आलेला आहे. साक्षीदार आशिष मधुकर खुटवड या साक्षीदारास साक्षीसमन्स काढले असता सदर साक्षीदार मयत असल्याचे निदर्शनास आले तसा दाखला सदर प्रकरणात दाखल आहे. साक्षीदार रविंद्रनाथ शिवशंकर गौंड या साक्षीदारास साक्षीसमन्स काढले असता सदर समन्स एमआयडीसी भोसरी यांच्याकडे वर्ग करण्यात आला. सदर साक्षीदार मिळून येत नसल्याबाबतचा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. साक्षीदार भगवंत सखाराम जैन या साक्षीदारास साक्षीसमन्स काढले असता सदर साक्षीदाराचा पत्ता अपुर्ण असल्याने मिळून आला नाही असा अहवाल दाखल करण्यात आलेला आहे. सदर अहवाल माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2025.08.01 11:52:21 +0530

( श्रीमती अ.ई. आवटी )
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**पिंपरी, पुणे.**

**दिनांक- ३०.०७.२०२५**